Chapter in Edited Books

Phule Samaj Sudharak Samiti's

SHAHIR ANNABHAU SATHE MAHAVIDYALAYA, MUKHED, DIST. NANDED (M.S.)

Jointly Organized with

S.R.T.M. University, Nanded.

One Day National Seminar

On Language & Social Science

# Gender Inequalities in Patriarchal Society

Chief - Editor

Principal Dr. Manohar Totare

Editor

Prof. G. Ramana Reddy

Dr. B.V. Pullagor

Scanned with CamScanner

ISBN 978-93-5240-102-4


४३. The Changing Roles and Images of Women in the Indian Movies: A Feminist Study
**Tadavi Ramesh M** ........... १९१

४४. भारतातील स्त्रियांचा सामाजिक दर्जा : एक दृष्टिक्षेप
**डॉ.प्रकर्ष सुभाषराव देशमुख** ........... १९७

४५. GENDER DISCRIMINATION AND PLACE OF WOMEN IN DEVELOPMENT
**Dr. M.D.Pathan** ........... २०२

४६. GENDER DISCRIMINATION
**UTKAR RAHUL VAIJNATHRAO** ........... २०७

४७. HEALTH BENEFITS OF REGULAR EXERCISE
**Elroy Pinto, Dr Gopal L Moghe** ........... २०९

४८. खेल विधाओं में महिलाओं के सहभागिता, प्रशिक्षण एवं खेल अभ्यास में आनेवाली समस्याओं का चिकित्सकीय अभ्यास
**प्रा.डॉ.राजेश प्र. कारंजकर** ........... २१५

४९. ROLE OF BODY LANGUAGE IN VERBAL COMMUNICATION
**KENDRE VITTHAL RANBA** ........... २२०

५०. योगासने व मानवी मन
**प्रा. डॉ. माधव शेजूळ , प्रा. वाकणकर गोविंद बन्सीधरराव** ........... २२५

५१. ब्रिटिश कालिन भारत में स्त्री शिक्षा का विकास
**प्रा. भालेराव संजय गणपती** ........... २२८

५२. प्रशासनातील महिलांच्या समस्या
**डॉ.शंकर लेखणे** ........... २३३

५३. PARTICIPATION OF WOMEN IN SPORTS
**Dr.Kalepwar Y.D.** ........... २३८

५४. भारतीय समाजरचनेतील लिंग विभेदन : एक सामाजिक समस्या
**प्रा. डॉ. सुरेश वि. धनवडे** ........... २४३

५५. Human Relationships in Nayantara Sahgal's Storm in Chandigarh and Doris Lessing's the Grass is Singing: a Study.
**Prof. Shilpa Namdevrao Shendge** ........... २४७


Scanned with CamScanner

ISBN 978-93-5240-102-4

# ५२.
# प्रशासनातील महिलांच्या समस्या

**डॉ.शंकर लेखणे**
लोकप्रशासन विभाग प्रमुख
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
शंकरनगर ता.बिलोली जि.नांदेड
भ्र.ध्वनी. ९४०३५२८६७३

**प्रस्तावना:-**

कोणत्याही समाजाची प्रगती ही त्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवरुन ठरत असते,त्या दृष्टीने आपण आजही प्रगती पथावर आहोत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले हे विधान राष्ट्राच्या विकासात असलेल्या स्त्रियांच्या सहभागाला अधोरेखित करणारे आहे. त्याचबरोबर स्त्रियांचा सर्वांगिण विकास घडवून आणणे आणि त्यांना सक्षम करुन राष्ट्रकार्यात सहभागी करुन घेणे किती गरजेचे आहे हे स्पष्ट करणारे आहे.

जगभरामध्ये स्त्रियांचा कला,क्रीडा ,समाजकारण,राजकारण आणि प्रशासन अशा विविध क्षेत्रातील सहभाग वाढत आहे. प्राचीन काळापासून लिंगभेदामुळे स्त्रियांच्या कार्यक्षेत्राला ज्या मर्यादा पडल्या होत्या त्या हळूहळू कमी होत गेल्या आहेत. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये तर अनेक सामाजिक रुढी व अनिष्ठ प्रथांमुळे स्त्रिया बंदिस्त जीवन जगत असत. मनुस्मृतीमधील पुढील श्लोकाचे अवलोकन केल्यास आपणास स्त्रियांच्या परावलंबित्वाची कल्पना येईल.

पिता रक्षति कौमारे ,भर्ता रक्षति यौवने ।
रक्षन्ति स्थविरे पुत्रा,न स्त्री स्वातन्त्र्य मर्हती ।।

अर्थात कौमार्य अवस्थेपर्यंत स्त्रियांचे रक्षण पिता करतो, तारुण्यात पती तर वृध्दावस्थेत पुत्र रक्षण करतो त्यामुळे ती कधीच स्वतंत्र नसते. एकंदरीत समाजाने लादलेल्या अनिष्ठ बंधनातून स्त्रियांना मुक्त करण्याचे कार्य राजा राममोहन राय, महात्मा ज्योतीराव फूले-क्रांतीज्योती सावित्रीबाई फूले या सारख्या समाजसुधारकांनी ब्रिटीश काळात जे प्रयत्न केले त्याचा इष्ट परिणाम होऊन स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्त्रिस्वातंत्र्याच्या चळवळीला गती येण्यासाठी आणि लिंगभेद कमी होण्यासाठी झालेला दिसून येतो.१ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या कलम ३९



Scanned with CamScanner

ISBN 978-93-5240-102-4

मध्ये समानतेच्या तत्वाचा समावेश करुन स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीत आणले व त्यांना सर्व क्षेत्रात सहभागाची समान संधी दिली. परिणामतः आज सर्व क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग उल्लेखनीय आहे. प्रशासकीय सेवेत तर सर्व श्रेणीमध्ये व सर्व खात्यांमध्ये स्त्रियांचा सहभाग झाला आहे. किरण बेदीसारख्या कर्तव्यदक्ष पोलीस अधिका-यांनी तर पोलीस प्रशासनात आपला वेगळा ठसा उमटविलेला आहे. शिक्षण,आरोग्य,विज्ञान व तंत्रज्ञान, कृषी,सामान्य प्रशासन,संरक्षण अशा विविध प्रकारच्या सेवाक्षेत्रात आणि प्रशासनात स्त्रिया जबाबदारीच्या पदावर कार्यरत आहेत.

ICSSR ने केलेल्या अभ्यासानुसार, भारतात इ.स.१९७१ साली महिला साक्षरतेचे प्रमाण १८.४ टक्के होते, १९८१ साली २५ टक्के होते. १९९१ मध्ये ते ३९.४२ टक्के इतके इ ाले त्यानंतर २००१ या वर्षी झालेल्या जनगणनेनुसार महिला साक्षरतेचे प्रमाण ५४.१६ टक्के झाले. आता तर ते अधिकच वाढले आहे.त्याच बरोबर या पाहणीत असेही दिसून आले आहे की, जी कामे पूर्वी स्त्रियांना दिली जात नसत अशा क्षेत्रातही आता स्त्रियांना रोजगाराची संधी देवून त्यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे.२ स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रिया दबलेल्या अवस्थेत होत्या आता त्या तितक्याच वेगाने आणि उत्स्फुर्तपणे प्रगती करीत आहेत.एका ठिकाणी हिंदी भाषेतील काव्य पंक्तीत उल्लेख केल्या प्रमाणे-

दबे मिट्टी में थे जितने,अधिक उतनेही अंकुराये ।
सताये हम गये जितने,अधिक उतनेही उबर आये ।।३

आज प्रशासनामध्ये स्त्रिया प्रभावीपणे कार्य करीत आहेत.परंतु काळाबरोबर नव्याने निर्माण झालेल्या समस्यांना तोंड दयावे लागत आहे.

**संशोधन लेखाचा उद्देश :-**

स्त्रीयांचा सर्व क्षेत्राबरोबर प्रशासनामध्ये सहभाग वाढला आहे परंतु प्रशासनात कार्य करताना त्यांच्या समोर अनेक समस्यांही निर्माण झाल्या आहेत ज्यामुळे त्यांना अडथळयांची शर्यत पार करावी लागत आहे. प्रस्तुत लेखामध्ये प्रशासनातील स्त्रियांच्या समस्यांचा अभ्यास करण्याचा उद्देश आहे.

**तथ्य संकलनः-**

प्रस्तुत संशोधन लेख वर्णनात्मक स्वरुपाचा असून त्याची मांडणी करण्यासाठी तथ्य संकलनाच्या दुय्यम स्रोतांचा अवलंब करण्यात आला आहे. संशोधकाकडून ,संस्थांकडून तसेच शासनाकडून करण्यात आलेल्या पाहणीचा,संशोधनाचा,अहवालाचा तसेच विषयाशी संबंधीत संदर्भ ग्रंथांचा आधार घेण्यात आला आहे.

**संकलित माहितीचे आशय विश्लेषणः-**



Scanned with CamScanner

ISBN 978-93-5240-102-4

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे तसेच मुलींच्या शैक्षणिक प्रगतीमुळे स्त्रियांचा प्रशासनातील सहभाग मोठया प्रमाणात वाढला आहे. शिक्षक,प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनिअर, पोलीस, स्थानिक, राज्य व केंद्र स्तरावरील प्रशासकीय अधिकारी अशा विविध क्षेत्रात स्त्रिया नेत्रदीपक कामगिरी करीत आहेत. परंतु त्याच बरोबर त्यांना कार्य करताना अनेक समस्यांना तोंड दयावे लागते.प्रामुख्याने कुटुंबाची जबाबदारी आणि नौकरीची जबाबदारी या दोन्हीमध्ये त्यांना कसरत करावी लागत आहे.नौकरी करणा-या स्त्रियांना मातृत्वाची भूमिका नीट निभावता येत नाही त्यामुळे प्रेम व वात्सल्याच्या अभावामुळे मुलांच्या नैसर्गिक विकासात बाधा येत आहेत.त्याचबरोबर कौटुंबिक जबाबदा-या सांभाळण्याच्या प्रयत्नात त्यांचा व्यावसायिक विकास होण्यातही अडचण निर्माण होत आहे.४

कौटुंबिक समस्यांबरोबरच स्त्रियांना सामाजिक व कार्यालयीन वातावरणात वावरत असतानाही कांही समस्यांना सामोरे जावे लागते.अनेकदा गुंडांकडून होणारी छेडछाड, लैंगिक शोषण,बलात्कार अशा गंभीर घटनांना बळी पडावे लागते.५ एकंदरीत समाज व कार्यालयीन परिसरात वावरताना स्त्रियांना पुरेशा सुरक्षेचा अभाव असल्याचे दिसून येते.

प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाने २०१६ साली पोलीस प्रशासनातील स्त्रियांच्या समस्यां संबंधी केलेल्या पाहणीत सुध्दा अनेक समस्या समोर आल्या आहेत. या पाहणीमध्ये अनेक स्त्रियांना नौकरी करीत असताना त्यांच्या पतीचा व कुटुंबातील इतर व्यक्तींचा म्हणावा तसा पाठिंबा मिळत नसल्याचे दिसून येते.त्याचबरोबर कार्यालयीन ठिकाणी महिला म्हणून आवश्यक असणारी प्रायव्हसी,स्वच्छता गृह या सारख्या मूलभूत बाबींचा अभाव दिसून येतो.तसेच आव्हानात्मक कार्यासाठी त्यांना सक्षम समजले जात नसल्याचे आणि केलेल्या कार्याबाबत सहकारी व अधिका-यांकडून पुरेशी मान्यता, प्रशंसा होत नसल्याचे पाहणीत दिसून आले आहे.६

अदनान जमील आणि अन्वर मोहियोद्दिन यांनी पाकिस्तानमधील पोलीस प्रशासनातील महिलांच्या समस्यांचा अभ्यास केला असता तेथील महिलांनाही अनेक समस्यांना तोंड दयावे लागत असल्याचे दिसून आले आहे. प्रामुख्याने तेथे प्रशासनात पुरुषांचे वर्चस्व असते त्यामुळे महिला पोलीसांना स्वयंनिर्णय घेताना मर्यादा पडतात.त्याचबरोबर कार्य करताना वरिष्ठांचा हस्तक्षेप व अत्याधिक दबाव येतो,त्याचबरोबर निवासाच्या तसेच पिक अँड ड्रॉप सर्विस-कार्यालयात ये-जा करण्यासाठी वाहनांचा अभाव असल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे दिसून आले आहे.७

अमेरिकेतील रॉकफेलर फाउंडेशनने जगभरातील वेगवेगळया देशातील ९५०० पेक्षा अधिक महिलांच्या पाहणीतून सर्वाधिक जाणवणा-या पाच समस्या मांडल्या आहेत.ज्या स्त्रियांना

ISBN 978-93-5240-102-4
प्रशासनात कार्य करत असताना भेडसावतात. त्या समस्या म्हणजे, नौकरी व व्यक्तिगत जीवन यात ताळमेळ बसविणे,समान वेतन,छेडछाड,व्यावसायिक संधीचा अभाव,नौकरी व मुलांचे संगोपन यात ताळमेळ बसविणे या होत.८ एकंदरीत जगभरातील प्रशासनात काम करणा-या स्त्रियांचे प्रश्न कांही अपवाद वगळता सारख्या प्रमाणात असल्याचे दिसून येते. आजही लिंगभेदामुळे महिलांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागते हे उपरोक्त विश्लेषणावरुन दिसून येते.मागास व विकसनशील राष्ट्राबरोबरच विकसित राष्ट्रातही लिंगभेद होत असल्याचे दिसून येते.वेतनाच्या बाबतीत अमेरिकेतही हे दिसून येते, अमेरिकेतील ४३ टक्के महिलांच्या मते त्यांना एकसारख्या कामासाठी पुरुषांच्या तुलनेत कमी वेतन मिळते.९

भारतात शासकीय सेवेत स्त्री -पुरुष असा भेद करुन वेतन दिले जात नाही परंतु खाजगी प्रशासनात समान वेतनाचे तत्व पाळले जातेच असे नाही .परंतु त्यावर उपाय योजना म्हणून भारत सरकारने इ.स.१९७६ साली समान वेतन कायदा लागू केला आहे.

प्रशासनातील महिलांच्या समस्यांचे अध्ययन करताना रौनक जहाँ यांनी बांगला देशात केलेले संशोधनही अनेक पैलूवर प्रकाश टाकणारे आणि महिलांच्या समस्यांना अधोरेखीत करणारे आहे. या संशोधनातून प्रशासनात कार्य करणा-या महिलांना पुढील समस्या येत असल्याचे स्पष्ट झाले आहे. कार्याचा अत्याधिक ताण, कौटुंबिक जीवनातील प्रश्न,पती-पत्नी संबंधातील बेबनाव व फारकत, प्रशासकीय कार्याबाबत एकाग्रतेचा अभाव, मुलांच्या संगोपनाकडे दुर्लक्ष, कार्यनिष्पत्ती असमाधानकारक, स्त्रीयांबाबतचा नकारात्मक दृष्टीकोन या सारख्या अनेक समस्या दिसून आल्या आहेत.परंतु या पैकी सर्वाधिक भेडसावणा-या तीन समस्या म्हणजे कार्याचा अत्याधिक ताण, प्रशासकीय कार्य करताना कार्य निष्पत्ती असमाधानकारक असणे व मुलांच्या संगोपनाकडे होणारे दुर्लक्ष या आहेत.१०

**निष्कर्षः-**

जगभरातील विविध देशात प्रशासकीय सेवेमध्ये कार्य करणा-या स्त्रियांच्या समस्यांचा आढावा घेतल्यास हे प्रकर्षाने दिसून येते की लिंग भेदामुळे त्यांना पुरुषांपेक्षा वेगळया व प्रखर समस्यांना तोंड दयावे लागत आहे. कुटुंब व नौकरी या दोन्ही आघाडयांना न्याय देण्याची सातत्याने कसरत करताना त्यांची दमछाक होत आहे.स्त्री म्हणून कार्यालयीन कार्यात मिळणारी दुय्यम वागणूक पुरुषी वर्चस्व सिध्द करणारी आहे.

डॉ.राम मनोहर लोहियांनी हे जग सुंदर होण्यासाठी ज्या क्रांत्या होण्याची आवश्यकता व्यक्त केली आहे त्यामध्ये रंगभेद, वर्णभेद, जातीभेद, भाषाभेद या सारख्या समस्यांच्या विरोधातील क्रांती बरोबरच स्त्री-पुरुष असमानते विरुध्दही क्रांती होणे गरजेचे असल्याचे म्हटले आहे.११

प्रशासनातील स्त्रीयांच्या समस्यांचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की केवळ



Scanned with CamScanner

ISBN 978-93-5240-102-4
कायदे करुन व समान अधिकार देवून भागणार नाही मर व्यक्ती-कुटुंब च समाज यांच्या स्त्रीयांकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात बदल होण्याची गरज आहे.शासन-कुटुंब व समाज या प्रश्नाबाबत संवेदनशील होणे गरजेचे आहे.

स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणे जोपर्यंत स्त्रियांच्या स्थीतीमध्ये सुधारणा होणार नाही तो पर्यंत जगाचे कल्याण होणे अशक्य आहे.कोणत्याही पक्षाला केवळ एका पंखाच्या आधाराने उडता येणे असंभनीय आहे.१२

**संदर्भः-**


१ डॉ.बाबासाहेब आंबेडकर,शोभा नाटाणी,भारतीय समाज और नारी,मार्क पब्लिकेशन,जयपुर,२०१० ,पृ.१२३ वरुन उद्धृत

२ डॉ.अल्का व्दिवेदी,भारतीय समाज में महिलाओंकी विकास यात्रा:एक ऐतिहासिक परिदृश्य,भारतीय नारी (संपादकः डॉ. शारदा अग्रवाल,राधा पब्लिकेशन,नई दिल्ली,२०१०,पृ.२७

३ प्रियंवदा शर्मा,महिला विकास के विविध स्वरुप,इक्कीसवी सदी का महिला सशक्तीकरण:मिथक एवं यथार्थ,(संपादकः डॉ.विरेंद्र सिंह यादव,ओमेगा पब्लिकेशन,दिल्ली,२०१०,पृ.२३३

४ शोभा नाटाणी, कित्ता पृ.१३२

५ कित्ता पृ.१३३

६ press trust of India women in police face privacy,sanitation issuses at work; survey published ७ feb.२०१६

७ Adnan Jamil,Anwar Mohyuddin,General problems faced by the women police, The explorer Islamabad; Journal of Social sciences volume १,issue ७ page २५५-२६३

८ press trust of India-ibid

९ ibid

१० Rawnak jahan,problems of working at field level; A study of women civil servants of Bangladesh, २०१०,page ४८

११ राम मनोहर लोहिया,शोभा नाटाणी,कित्ता पृ.१२३

१२ स्वामी विवेकानंद,शोभा नाटाणी ,कित्ता पृ.१२३




Scanned with CamScanner